न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# 'डीबीटी'मुळे 15 हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य

## ई-रूपी सारख्या डिजिटल पेमेंट प्रक्रियेमुळे निधीचा कार्यक्षमतेने वापर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्व शाळा दिनांक १६ जूनपासून उत्साहात सुरु झाल्या. पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) उपक्रमातून शालेय व आवश्यक साहित्यांचे वाटप सुरु केले असून आत्तापर्यंत सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळाला आहे.




शाळांकडून साहित्याच्या किटचे यशस्वीपणे वितरण करून एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने, डिजिटल ई-रूपी पेमेंट प्रक्रिया राबवल्यामुळे साहित्य वितरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येऊन सदर प्रक्रिया जलदपणे राबवण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने थेट लाभ हस्तांतरण उपक्रमातून साहित्यांचे वाटप करण्यासाठी शहरातील वितरकांची नेमणूक केली असून त्यांच्याकडून डिजिटल ई-रुपी पेमेंटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना साहित्य उपलब्ध होत आहे. शाळा सुरु होऊन आता १२ इतके दिवस झाले असून आत्तापर्यंत सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना साहित्य मिळाले आहे. अद्यापही विद्यार्थी व पालकांकडून साहित्य घेण्याची प्रक्रिया सुरु असून यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध होईल. यामध्ये क्यूआर कोडद्वारे साहित्य वाटप केली असून तब्बल ४ कोटी रुपयांच्या साहित्याचे महापालिकेने विद्यार्थ्यांना वाटप केल्याचे शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगिता बांगर यांनी माहिती देताना स्पष्ट केले.

> भविष्यमध्येही डीबीटी उपक्रमासाठी जलद आणि कार्यक्षम प्रक्रिया राबवणार आहे. चालू शैक्षणिक वर्षामध्येसुध्दा डीबीटीच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे आमच्या विद्यार्थ्यांना उच्च-गुणवत्तेचे साहित्य पुरवता आले आहे. ई-रूपी सारख्या डिजिटल पेमेंट प्रक्रियेमुळे निधीचा कार्यक्षमतेने वापर करण्यात आला असून याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. गतवर्षी यशस्वी झालेल्या उपक्रमामुळे चालूवर्षीसुध्दा प्रत्येक विद्यार्थ्याला लाभ घेता येत असून यापुढेही एकही विद्यार्थी सदर साहित्यापासून वंचित राहणार नाही याची काळजी आम्ही घेणार आहोत.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

> डीबीटी उपक्रमातील अनेक आव्हानांवर मात करून विद्यार्थ्यांना मौल्यवान शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे. ई-रूपी डिजिटल पेमेंट प्रक्रिया वापर करून आम्ही निधीचा कार्यक्षमपणे वापर केला आहे. त्याबरोबरच पालक आणि विद्यार्थ्यांकरिता पेमेंटची संपूर्ण प्रक्रिया सुलभ केली आहे. आमच्या समोरील विक्रेत्यांचे वर्गीकरण, दर्जेदार उत्पादनांची पडताळणी अशा आव्हानांवर मात करून आम्ही विद्यार्थ्यांना मौल्यवान शिक्षण देत आहोत. आगामी काळामध्ये 'डीबीटी' उपक्रमामध्ये जलद आणि अधिक कार्यक्षम प्रक्रिया राबवण्यासाठी कटिबद्ध आहोत.
>
> **- प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

---

# आमदार अमित गोरखे यांची विधानपरिषदेच्या 'तालिका सभापती' पदी निवड

## पावसाळी अधिवेशन 2025 मध्ये भाजपच्या तरुण आमदाराची महत्त्वपूर्ण नियुक्ती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळी अधिवेशन २०२५ च्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, भाजपचे अभ्यासू आणि नव-चर्चित तरुण आमदार अमित गोरखे यांची महाराष्ट्र विधानपरिषदेच्या तालिका सभापतीपदी निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीची अधिकृत घोषणा विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी सभागृहात केली.



या निवडीवर प्रतिक्रिया देताना आमदार अमित गोरखे म्हणाले "सभापती राम शिंदे यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास माझ्यासाठी अत्यंत सन्मानाची आणि जबाबदारीची बाब आहे. तालिका सभापतीपद ही केवळ एक पद नाही, तर विधानपरिषदेच्या कार्यवाहीतील शिस्त, प्रक्रियात्मक पारदर्शकता आणि संयमाचे प्रतिनिधित्व करणारी भूमिका आहे. या पदाचा योग्य मान राखण्यासाठी आणि सभागृहाच्या कार्यक्षमतेला चालना देण्यासाठी मी पूर्ण प्रामाणिकपणे योगदान देईन. "नवनिर्वाचित आमदार म्हणून सभागृहात माझे पदार्पण होत असतानाच मला हे पद मिळणे, हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. आपण माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो माझ्यासाठी अनमोल आहे. मी सभागृहातील सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानतो, ज्यांनी या निवडीला सहमती दर्शवली."

"विशेषतः महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे मी मनापासून आभार मानतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि आशीर्वादामुळेच मी आज या जबाबदारीच्या ठिकाणी उभा आहे. आपण दाखवलेला विश्वास मी नक्कीच सार्थ ठरवीन."

आमदार अमित गोरखे यांना त्यांची ठाम वक्तृत्वशैली, मुद्देसूद अभ्यास, आणि जनतेशी असलेली थेट नाळ यासाठी ओळखले जाते. या नियुक्तीमुळे विधानपरिषदेत भाजपच्या युवा नेतृत्वाला बळ मिळाले असून, सभागृहात नवा ऊर्जा प्रवाह निर्माण होईल, असा विश्वास अनेक मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

# ओल्या कचऱ्यापासून 'बायो-सीएनजी' निर्मिती

## दररोज सुमारे 300 टन कचऱ्यावर प्रक्रिया; नगरविकास विभागाची मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात तयार होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून 'बायो-सीएनजी'निर्मिती प्रकल्प महापालिकेच्या वतीने सुरू केला जाणार आहे. दररोज सुमारे ३०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची या प्रकल्पाची क्षमता आहे. खासगी ठेकेदारामार्फत हा प्रकल्प उभारला जाणार आहे.




केंद्र, तसेच राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानातून हा प्रकल्प उभारण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत अभियान (शहरी) २.०' आणि राज्य सरकारच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत सर्व शहरांना कचरामुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. घनकचऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन, स्वच्छता, तसेच सांडपाण्याच्या पुनर्वापराला प्राधान्य दिले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या घनकचरा विभागाने नगरविकास विभागाकडे ओल्या कचऱ्यापासून बायो-सीएनजी तयार करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्याला मान्यता देण्यात आली आहे.

ओल्या कचऱ्यापासून खत तयार करण्यासाठी यापूर्वी दररोज ६७५ टन क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७२ कोटी ६२ लाख रुपये आणि लँडफीलिंगसाठी ७ कोटी ८६ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. हा प्रकल्प रद्द करून तो निधी बायो-सीएनजी तयार करण्याच्या प्रकल्पासाठी वापरला जाणार आहे. बायो-सीएनजी तयार करण्यासाठी ८२ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये केंद्र सरकारचा हिस्सा २० कोटी ५२ लाख, राज्य सरकारचा भाग २८ कोटी ७३ लाख, तर महापालिकेला ३२ कोटी ८४ लाख रुपयांचा भार उचलावा लागणार आहे.

हा प्रकल्प उभारण्यासाठी मोठ्या जागेची आवश्यकता आहे. ती शहरात उपलब्ध होणे अशक्य असल्याने शहराबाहेर प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. निवासी मिळकतींपासून हा प्रकल्प किमान २०० मीटर लांब अंतरावर असला पाहिजे. तसेच यासाठी बफर झोन गरजेचा असल्याचे घनकचरा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

> शहरात तयार होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून 'बायो-सीएनजी' तयार करण्याचा प्रकल्प महापालिका उभारणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून दररोज सुमारे ३०० टन कचऱ्याची विल्हेवाट लागणार आहे. प्रकल्पासाठी जागा खासगी ठेकेदारच उपलब्ध करून देणार आहे.
>
> **- संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पुणे महापालिका.**

# ससून रुग्णालयात पहिली यशस्वी रोबोटिक शस्त्रक्रिया

## शस्त्रक्रिया पूर्णतः सरकारी यंत्रणेद्वारे; अत्याधुनिक उपचार आता गरजू रुग्णांसाठीही उपलब्ध

**पुणे | प्रतिनिधी**

बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या वैद्यकीय इतिहासात एक नवा मैलाचा दगड ठरणारी घटना नुकतीच घडली आहे. ससून रुग्णालयात पहिल्यांदाच एका तरुण महिलेवर अत्याधुनिक रोबोटिक प्रणालीद्वारे पित्ताशयाची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. ही शस्त्रक्रिया पूर्णतः सरकारी यंत्रणेद्वारे आणि गरजू रुग्णांसाठी विनामूल्य करण्यात आली आहे.



महिला रुग्णास पोटदुखीच्या तक्रारीमुळे ससून रुग्णालयात दाखल केले होते. तपासणीत पित्ताशयात खडे असल्याचे निदान झाल्यानंतर डॉक्टरांनी रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर करून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. सुसज्ज ऑपरेशन थिएटरमध्ये अत्याधुनिक रोबोटिक प्रणालीच्या सहाय्याने ही शस्त्रक्रिया अत्यंत अचूकतेने व सुरक्षित पद्धतीने पार पडली.

या शस्त्रक्रियेसाठी कुशल वैद्यकीय पथकाची साथ लाभली आहे. या पहिल्या रोबोटिक शस्त्रक्रियेचे नेतृत्व शल्यचिकित्साशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. लता भोईर यांनी केले. त्यांच्या सहकार्याने डॉ. आशिष चव्हाण, डॉ. सागर कुर्कुरे आणि डॉ. पुनिमा अग्रवाल यांनी शल्यचिकित्सक म्हणून सहभाग घेतला. शस्त्रक्रियेवेळी भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. सुरेखा शिंदे, डॉ. नेहा कांबळे, डॉ. सुजित क्षीरसागर आणि डॉ. अनुजा यांनी जबाबदारी पार पाडली. तसेच, ऑपरेशन थेटरमध्ये शस्त्रक्रिया परिचारिका प्रमुख राजश्री कानडे, उज्वला गरुड, शमा बांदिसोडे आणि साधना धोमसे यांनी सेवा दिली.

या शस्त्रक्रियेच्या यशामागे मागील काही महिन्यांपासून रुग्णालयात जूरू असलेले प्रशिक्षण आणि नियोजन हे प्रमुख कारण ठरले. डॉक्टर, नर्सेस व शस्त्रक्रिया सहायक यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी ससून रुग्णालयात उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक सर्जिकल सिम्युलेटरचा प्रभावी वापर करण्यात आला. रोबोटद्वारे शस्त्रक्रिया होण्यासाठी स्वतंत्र आणि अत्याधुनिक ऑपरेशन थिएटरची उभारणीदेखील करण्यात आली. ससून रुग्णालयात रोबोटिक तंत्रज्ञानावर आधारित आणखी शस्त्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार असून, ही सुविधा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी एक मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास वैद्यकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे.

### रोबोटिक शस्त्रक्रियेचे फायदे

**» अधिक अचूक आणि सूक्ष्म पद्धतीने शस्त्रक्रिया, पारंपरिक पद्धतीपेक्षा कमी वेदना, लवकर बरे होणे आणि रुग्णालयातून त्वरित डिसचार्ज, क्लिष्ट व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित.**

> खासगी रुग्णालयांमध्ये अशा रोबोटिक शस्त्रक्रियेसाठी ३ ते ५ लाख रुपयांचा खर्च येतो. मात्र ससून रुग्णालयात तीच सुविधा गरजू रुग्णांना पूर्णतः विनामूल्य दिली जात आहे. आम्ही नेहमीच गरजूंना दर्जेदार आणि अत्याधुनिक वैद्यकीय सेवा देण्यास कटिबद्ध आहोत.
>
> **- डॉ. एकनाथ पवार, अधिष्ठाता, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून रुग्णालय.**

> रोबोटिक शस्त्रक्रिया हे तंत्रज्ञान सामान्यांसाठी एक वरदान ठरणार आहे. कर्करोग, हर्निया यांसारख्या गुंतागुंतीच्या विकारांवर अधिक अचूकतेने उपचार करणे शक्य झाले आहे. विशेषतः सरकारी रुग्णालयात अशा प्रकारची अत्याधुनिक सुविधा उपचारासाठी उपलब्ध झाली आहे.
>
> **- डॉ. लता भोईर, विभागप्रमुख शल्य चिकित्साशास्त्र, ससून.**

# महापालिका विकास आराखडासंदर्भात हरकतींचा पाऊस

## शहरातील बांधकाम व्यावसायिकांच्या भल्यासाठी काही आरक्षणे जाणीवपूर्वक प्रस्तावित केल्याचे आरोप खुलेआमपणे केला जात आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यातील (डीपी) अनेक आरक्षणे ही जाणीवपूर्वक टाकण्यात आल्याची नागरिकांतून ओरड होत आहे. शहरातील बांधकाम व्यावसायिकांच्या भल्यासाठी काही आरक्षणे जाणीवपूर्वक प्रस्तावित केल्याचे आरोप खुलेआमपणे केला जात आहे. डीपीच्या विरोधात अक्षरशः हरकतींचा पाऊस पडत आहे. डीपीमध्ये गौडबंगाल असल्याचा संशय नागरिकांसह विरोधकांकडून व्यक्त केला जात आहे.

महापालिकेने शहराचा डीपी 16 मे रोजी प्रसिद्ध केला. त्यासाठी 14 जुलैपर्यंत हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. डीपीतील जुने रस्ते अधिक रुंदीचे दाखविण्यात आले आहेत. अनेक वर्षांपासून रखडलेला एचसीएमटीआर (रिंगरोड)चा मार्ग व स्टेशन दर्शविण्यात आले आहेत. केंद्र, संरक्षण विभाग, जिल्हाधिकारी यांनी रेड झोनचा अचूक नकाशा प्रसिद्ध केलेला नसताना महापालिकेने रेड झोनची सीमा स्पष्ट करीत अनेक आरक्षणे प्रस्तावित केली आहेत. त्यामुळे हजारो घरे बाधित होत आहेत. परिणामी, तो भाग विकासापासून वंचित राहणार आहे.




### विचारात न घेतल्याने अधिकाऱ्यांचे तोंडावर बोट

» महापालिकेच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून हा डीपी तयार करणे अपेक्षित होते. त्यासाठी तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन तशा सूचना दिल्या होत्या. त्यासाठी तत्कालीन मुख्य अभियंता रामदास तांबे यांची समन्वयक म्हणून नेमणूक केली होती. मात्र, पाटील यांची अचानक बदली झाल्यानंतर त्यात खंड पडला. महापालिकेने नियुक्त केलेल्या गुजरातच्या एचसीपी या खासगी एजन्सीने सॅटेलाईट मॅपद्वारे नकाशा तयार करून आरक्षणे प्रस्तावित केल्याचे अधिकारी खासगीत सांगत आहेत. महापालिकेच्याच अधिकाऱ्यांना विचारात न घेता कोठेही कसेही आरक्षणे टाकल्याने महापालिका वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगली आहे.

चिखलीतील कुदळवाडी व परिसरात मोठ्या प्रमाणात धडक अतिक्रमण कारवाई केल्यानंतर त्या भागात मोठ्या संख्येने व्यापारी संकुलाचे आरक्षणे टाकण्यात आली आहेत. शाळा, भाजी मंडई, बाजारपेठ, दवाखाना असे आरक्षण असताना पुन्हा नव्याने त्या भागांतच दुसऱ्या जागेत तीच आरक्षणे दर्शविण्यात आली आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी गृहप्रकल्प उभारले असताना, पुन्हा चिखली भागात त्या गृहप्रकल्पांची आरक्षणे दाखविण्यात आली आहेत.

पवना, इंद्रायणी आणि मुळा नदी सुधार योजनेसाठी नदीकाठच्या जमिनी खरेदी करून त्या ताब्यात घेण्यात येणार आहेत. त्या जागेवर महापालिका उद्यान, जॉगिंग ट्रॅक, सुशोभीकरण, वनीकरण करणार आहे. तसेच, अनेक ठिकाणी नदीची निळी व लाल पूररेषा बदलण्यात आल्या आहेत. ग्रीन झोन आणि औद्योगिक झोनचे क्षेत्र कमी करून त्या ठिकाणी निवासी झोन करण्यात आले आहे.

महापालिकेला मागील डीपीतील आरक्षणे 100 टक्के विकसित करण्यात यश आलेले नाही. शहरातील सुमारे 60 टक्के आरक्षणांच्या जागा महापालिकेस ताब्यात घेता आल्या आहेत. चाळीस टक्केपेक्षा अधिक जागा अद्याप ताब्यात आलेल्या नाहीत. अनेक आरक्षणे कागदावरच आहेत. निव्वळ बांधकाम व्यावसायिकांच्या भल्यासाठी त्यांच्या गृह व व्यापारी प्रकल्पांना प्रतिसाद मिळावा म्हणून नागरी सेवा व सुविधांची आरक्षणे प्रस्तावित करण्याचा प्रयत्न डीपीतून साधण्यात आल्याचा आरोप होत आहे. डीपीच्या विरोधात आत्तापर्यंत 13 हजारांपेक्षा अधिक हरकती प्राप्त झाल्या आहेत. एकाच भागातून 500 ते 1 हजार हरकतींचे गठ्ठे सादर केले जात आहेत.

### आत्तापर्यंत 13 हजारांपेक्षा अधिक हरकती

» डीपीतील आरक्षणांबाबत शहरात रोष वाढत आहे. त्यामुळे जागामालक, शेतकरी तसेच, रहिवाशी मोठ्या संख्येने आरक्षणांवर हरकती घेत आहेत. हरकतींचे गठ्ठे दररोज नगर रचना विभागात सादर केले जात आहेत. त्यासाठी मोठी गर्दी होत आहे. हरकतींची संख्या लक्षात घेता महापालिकेत स्वतंत्र टेबल आहेत. सार्वजनिक सुट्ट्या वगळता हरकतींसाठी आता केवळ 11 दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. त्यामुळे हरकतींच्या संख्येत मोठी भर पडणार आहे.

# पर्यटकांना खुणावतंय नाणे मावळ !

## निसर्गाच्या सानिध्यातील श्रीक्षेत्र कोंडेश्वर ठिकाणी भाविकांसह पर्यटकांची होते गर्दी


**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंगी, मलेरिया आणि चिकन गुणिया यांसारख्या साथीचे आजारांचा प्रादुर्भाव वाढत आहे. तो रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे 'ब्रेक द चेन' ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून प्रतिबंधात्मक उपाय, जनजागृती, स्वच्छता आणि नागरिकांच्या सहभागातून डास निर्मूलन करण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या डेंग्यू प्रतिबंधात्मक धोरणानुसार 'तपासा, स्वच्छ ठेवा आणि झाका' ही त्रिसूत्री प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. याअंतर्गत प्रत्येक नागरिकाने आपल्या आजूबाजूच्या परिसरात साचलेले पाणी तपासणे, दर आठवड्याला टाक्या व पाणी साठवणाऱ्या भांड्यांची स्वच्छता करणे आणि पाणी साठवणारी भांडी झाकून ठेवणे आवश्यक आहे.

जनजागृतीसाठी व्याख्याने, रॅली, पोस्टर स्पर्धा, पथनाट्य, सोशल मीडिया व्हिडिओ आणि एलईडी स्क्रिनद्वारे माहितीप्रसार या सर्व माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे. सामाजिक संस्थांच्या मदतीने चर्चासत्र, परिसंवाद आणि जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. या मोहिमेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी नोडल वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी, कीटकनाशक निरीक्षक अशा अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या ८ विशेष पथकांची नियुक्ती केली आहे. ही पथके शहरभर डेंगीप्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यरत राहणार आहेत.

ही उपाययोजना सर्वांनी केल्यास डेंगीच्या प्रसाराला प्रतिबंध करता येईल. याच अनुषंगाने महापालिकेने या मोहिमेला अधिक परिणामकारक बनवण्यासाठी 'ब्रेक द चेन' मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांनी डेंगीविरोधात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



### भक्ती अन् पर्यटनाचा संगम श्रीक्षेत्र कोंडेश्वर

» मावळमधील नाणे मावळ भागातील श्रीक्षेत्र कोंडेश्वर हे असे ठिकाण आहे जिथे आपल्याला निसर्ग आणि तीर्थ या दोन्ही गोष्टी पाहायला मिळतात. ऐतिहासिक श्रीक्षेत्र कोंडेश्वर मंदिर आणि त्या भोवतीचा अद्भुत निसर्ग पाहणे म्हणजे स्वर्गीय सुखच. याच सुखाची अनुभूती घेण्यासाठी सध्या राज्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक नाणे मावळ भागात येत आहेत.

> श्री कोंडेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने येथे येणाऱ्या नागरिकांसाठी अनेक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. मंदिराच्या परिसरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे. कोंडेश्वरकडे येणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण, पार्किंगची सुविधा, निवारा शेड, स्वच्छतागृहे नव्याने निर्माण करण्यात आली आहे. तर येथे येणाऱ्या भाविक, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पोलीस पाटील, स्वयंसेवक कायमस्वरूपी उपलब्ध असतात
>
> - गणपत ठोसर, अध्यक्ष, श्री कोंडेश्वर देवस्थान ट्रस्ट

# इंदापूर तालुक्यातील वाढीव गट-गण रचनेची चर्चा तापली!

## नवीन राजकीय गणित, इच्छुक उमेदवारांची घालमेल : तालुक्याचे लक्ष रचनेच्या प्रारूपावर

**पुणे | प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे दालन खुले झाले आहे. यामुळे गेली सव्वातीन वर्षे प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया मार्गी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर इंदापूर तालुक्यात एक नवीन जिल्हा परिषद गट आणि दोन नवीन पंचायत समिती गणांची भर पडणार असल्याने, संपूर्ण तालुक्याचे लक्ष या बदलाच्या प्रक्रियेवर केंद्रीत झाले आहे.

राज्यात निवडणुकींची प्रक्रिया पुन्हा सुरू होत असताना गट व गण रचना ही एक अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जात आहे. याच प्रक्रियेवर भविष्यातील राजकीय वर्चस्व, संधी आणि आव्हानांचे गणित ठरणार आहे. प्रशासनाने 14 जुलैपर्यंत प्रारुप रचना प्रसिद्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, तर त्यानंतर 18 ऑगस्टपर्यंत अंतिम मंजुरी मिळवून प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. या प्रारूपावर इच्छुक उमेदवार, राजकीय गट आणि सामान्य नागरिक हरकती, आक्षेप, सूचना देऊ शकतात. त्या तहसीलदार कार्यालयाकडून स्वीकारल्या जातील. नंतर जिल्हाधिकारी यावर अहवाल तयार करून विभागीय आयुक्तांकडे पाठवतील आणि अंतिम निर्णय आयुक्त सुनावणीद्वारे देतील.

गट-गण रचनेनंतर अनेक संभाव्य इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीच्या तयारीस सुरुवात केली होती. काहींनी मतदारसंघात सेवा केली, संपर्क वाढवला, कार्यकर्ते बांधले. मात्र, आता मतदारसंघ रचना बदलल्याने अनेकांचा कार्यक्षेत्र बदलण्याची भीती आहे. काही गावे व वाड्या नवीन गटांत जाणार असल्याने स्थानिक नेतृत्वाची भिती व संधी दोन्हीही आहे. नवीन गटाची जागा कुठे असेल? कोणत्या गावांचा समावेश होणार? कोणाचा वर्चस्व असलेला मतदारसंघ विभाजित होणार? या प्रश्नांवर सध्या राजकीय चर्चांचे वारे वाहत आहेत. 2017 मध्ये झालेल्या निवडणुकीत इंदापूर तालुक्यात 7 जिल्हा परिषद गट आणि 14 पंचायत समिती गण होते. या निवडणुकीत क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांचे गट जिल्हा परिषदेवर प्रभावी होते, तर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या समर्थकांचा पंचायत समितीत वरचष्मा होता. त्यामुळे आगामी निवडणुकीत नेमक्या कोणत्या भागात गट तयार होतात, कोणते भाग विभाजित होतात, यावर राजकीय समीकरणे ठरणार आहेत.



### तालुक्याच्या राजकारणात हालचाल वाढली

» वाढीव गट-गण रचनेनंतर इंदापूर तालुक्यातील राजकारणात पुन्हा एकदा हालचाल सुरू झाली आहे. काही गावे व वाड्या नवीन गटांत जाणार असल्याने स्थानिक नेतृत्त्वाची भिती व संधी दोन्हीही आहे. नवीन गटाची जागा कुठे असेल? कोणत्या गावांचा समावेश होणार? कोणाचा वर्चस्व असलेला मतदारसंघ विभाजित होणार? या प्रश्नांवर सध्या राजकीय चर्चांचे वारे वाहत आहेत.

### नव्या संधी की जुनी घसरण?

» गट-गण रचनेनंतर अनेक संभाव्य इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीच्या तयारीस सुरुवात केली होती. काहींनी मतदारसंघात सेवा केली, संपर्क वाढवला, कार्यकर्ते बांधले. मात्र, आता मतदारसंघ रचना बदलल्याने अनेकांचा कार्यक्षेत्र बदलण्याची भीती आहे. आपण केलेली सेवा वाया तर जाणार नाही ना? असा प्रश्न अनेक कार्यकर्त्यांमध्ये ऐकायला मिळत आहे.

### नजर टाकूया आगामी कालबद्ध टप्प्यांवर:

- » 14 जुलै – प्रारूप गट/गण रचना प्रसिद्ध
- » 8 जुलै-अगस्ट – आक्षेप, हरकती, सूचना स्वीकारणे
- » 18 ऑगस्ट – अंतिम मंजुरी व अधिसूचना

# महिला सरपंच पतींची ग्रामपंचायत कारभारामध्ये लुडबुड

## आंबेगाव तालुक्यात अनेक गावांत महिला सरपंचांचे पतीच सरपंच असल्याच्या तोऱ्यात

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील बहुतांशी गावात महिला सरपंच पद आरक्षण असल्याने जनतेतून लोकनियुक्त सरपंचपदी महिला विराजमान झाल्या आहेत. परंतु बहुतांशी गावामध्ये महिलां सरपंचाचे पतीच सरपंच असल्याच्या तोऱ्यात मिरवताना दिसत आहे. महिला सरपंच पतींची ग्रामपंचायत कारभारामध्ये लुडबुड वाढल्याने ग्रामपंचायत सदस्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

बहुतांशी पतीराज ग्रामपंचायत कर्मचारी,सदस्य व विरोधकांना विचारात न घेता आपली मनमर्जी चालवताना दिसून येत आहे.त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली असून काही ग्रामपंचायतीमध्ये अविश्वास ठराव दाखल करण्याच्या प्रयत्नात सत्ता गट व विरोधकातील सदस्य तयारीत असल्याचे दिसून येत आहे. महिला सरपंचांचे पती ग्रामपंचायत कारभारामध्ये लक्ष घालत असल्याने सदस्यांमध्ये नाराजीचा सूर दिसून येत आहे. काही महिला सरपंचांचे पती, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांना विश्वासात न घेता ग्रामसेवकांशी संगनमत करून परस्पर ग्रामपंचायत मध्ये होणारी कामे मार्गी लावताना दिसत आहे.

त्यामुळे ग्रामपंचायत कर्मचारी, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य या सर्वांमध्ये महिला सरपंच व त्यांच्या पती विरोधात नाराजीचा सूर दिसून येत असल्याच्या तक्रारी स्थानिक आमदारांपर्यंत जावू लागल्या आहेत. काही गावांमध्ये ग्रामसभेत सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य यांच्यामध्ये शाब्दिक चकमक उडून हमरीतुमरी होवून वाद होताना दिसून येत आहे.

काही गावांमध्ये महिला सरपंचांचे पतीच ग्रामपंचायत माध्यमातून होणारी कामे स्वतः ठेकेदारामार्फत करून घेत आहे. बहुतांश ठिकाणी महिला सरपंच ह्या फक्त कागदोपत्री सही करत असून त्यांच्या पदाचा कारभार हे त्यांचे पतीराजच पाहताना दिसून येत आहे.



### पतिराजांच्या सल्ल्यानुसार सल्ला

» पती राजांच्या सल्ल्यानुसार काही महिला सरपंच ग्रामपंचायतीचे काम करत आहे.महिला आरक्षण शासनाने दिले असले तरी शासनाचा उद्देश पती राजांच्या ग्रामपंचायत हस्तक्षेपामुळे सफल झालेला दिसत नाही. काही ठिकाणी महिला सरपंच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्याना जुमानत नसल्याने डोकेदुखी होऊन बसल्याने गावाच्या विकास कामावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.